ABHITA LAND SOLUTIONS PVT. LTD.



*Selling Solutions, Not Promises*

# ABHITA LAND SOLUTIONS PVT. LTD

Corporate Office No-1208 12th Floor International Trade Centre
Kamdhenu, Sector-14 Kharghar, Navi Mumbai - 410210.

info@abhitalandsolutions.com www.abhitalandsolutions.com +91-7710073844



WE PROVIDE
ALL TYPES OF

# PROPERTY LIAISONING SERVICES

ABHITA LAND SOLUTIONS PVT. LTD

Corporate Office No-1208 12th Floor International Trade Centre
Kamdhenu, Sector-14 Kharghar, Navi Mumbai - 410210.

info@abhitalandsolutions.com www.abhitalandsolutions.com +91-7710073844

**ABHITA LAND SOLUTIONS PVT. LTD.**



| | |
|---|---|
| ➤ Consultancy | – मार्गदर्शन |
| ➤ Search Report | – शोध अहवाल |
| ➤ Tital Report | – शीर्षक अहवाल |
| ➤ Legal Audit | – कायदेशीर अंकेक्षण |
| ➤ Property & Machinery Valuation | – मालमत्ता आणि यंत्रसामग्री मूल्यांकन |
| ➤ Registration (All Deeds) | – नोंदणी |
| ➤ Rent Agreement | – भाडे करारनामा |
| ➤ Sale / Purchase / Rent | – खरेदी / विक्री / भाडे |
| ➤ Survey with a Drone | – ड्रोनद्वारे अचूक जमीन मोजणी |
| ➤ Succession & Heirship Certificate | – उत्तराधिकारी आणि वारस प्रमाणपत्र |
| ➤ Geotechnical Services | – जिओटेक्निकल सर्विसेस |


Corporate Office No-1208 12th Floor, International Trade Centre Kamdhenu, Sector-14 Kharghar, Navi Mumbai - 410210.

+91-7710073844

www.abhitalandsolutions.com

info@abhitalandsolutions.com


## INTRODUCTION

**Abhita Land Solutions Pvt. Ltd.** is a Private Limited Company. The Company has a team of professionals including lawyers, Intellectual property experts, technical experts with the specific industry expertise, resources and commitment required to meet all client requirements.

The company is expanding its operations throughout Maharashtra and India and is growing into a leading solution provider for land and property related matters with impeccable integrity and professional ethics.

We believe in providing our best possible services and strive to treat all our clients with utmost respect so that they feel at home when they come to **Abhita Land Solutions Pvt. Ltd.**

## CONSULTANCY / PROPOSAL SERVICES

1. Conversion of Agriculture Land into non-agriculture and also conversion of zone
2. Purchase permission of tribal land to tribal person
3. Purchase permission of tribal land to non-tribal person
4. Prepare proposal to convert class-2 land into class-1
5. Permission to sell class-2 land
6. Conversion of land obtained under the Tenancy Act into class-1
7. Permission to sell land under land Ceiling Act
8. Obtain Permission to sell land acquired under the Rehabilitation Act
9. Permission to sell fragmented agricultural land under Fragmentation Act
10. Permission for dividation of N.A. Plot
11. All work related to agricultural land of Bhudan Yagna Mandal
12. Correction of name & area in 7/12 extract
13. Conversion of Non-usable land into usable land proposal
14. All types of services related to CIDCO/MHADA/ SRA/MMRDA/PMRDA



**ABHITA LAND SOLUTIONS PVT. LTD.**

1. अकृषक शेतजमिनीचा (N.A) प्रस्ताव तयार करणे व त्याकरिता आवश्यक त्या परवानग्या मिळवण्याकरिता कायदेशीर सहाय्य
2. आदिवासी ते आदिवासी शेत जमिनीची विक्री परवानगी
3. आदिवासी ते गैर-आदिवासी शेत जमिनीची विक्री परवानगी
4. वर्ग-२ च्या शेत जमिनीची विक्री परवानगी
5. सिलिंग कायद्यांतर्गत मिळालेली शेतजमिनीची विक्री परवानगी
6. वर्ग -२ ची शेती वर्ग -१ मध्ये रुपांतरित करण्याचा प्रस्ताव बनविणे
7. पुनर्वसन कायद्यांतर्गत प्राप्त झालेल्या शेतीची विक्री परवानगी
8. तुकडेबंदी कायद्यांतर्गत तुकडे विक्री परवानगी
9. कुळ कायद्यांतर्गत मिळालेली शेती वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे
10. N.A अकृषक प्लॉटसचे विभाजन परवानगी
11. शेत जमिनी संबधी भूदान यज्ञ मंडळाची सर्व कामे
12. ७/-१२ उताऱ्यातील क्षेत्रफळ व नावांची दुरुस्ती प्रकरणे
13. पोटखराब - "अ" शेती वहिती आणण्याचा प्रस्ताव बनविणे
14. CIDCO/MHADA/SRA/MMRDA/PMRDA सर्व प्रकारच्या सेवा



**ABHITA LAND SOLUTIONS PVT. LTD.**



- Consultancy - मार्गदर्शन
- Search Report - शोध अहवाल
- Tital Report - शीर्षक अहवाल
- Legal Audit - कायदेशीर अंकेक्षण
- Property & Machinery Valuation - मालमत्ता आणि यंत्रसामग्री मूल्यांकन
- Registration (All Deeds) - नोंदणी
- Rent Agreement - भाडे करारनामा
- Sale / Purchase / Rent - खरेदी / विक्री / भाडे
- Survey with a Drone - ड्रोनद्वारे अचूक जमीन मोजणी
- Succession & Heirship Certificate - उत्तराधिकारी आणि वारस प्रमाणपत्र
- Geotechnical Services - जिओटेक्निकल सर्विसेस

Corporate Office No-1208 12th Floor, International Trade Centre Kamdhenu, Sector-14 Kharghar, Navi Mumbai - 410210.

info@abhitalandsolutions.com www.abhitalandsolutions.com +91-7710073844

ABHITA LAND SOLUTIONS PVT. LTD.

# OUR SERVICES

- Sale Deed – खरेदीखत
- Mortgage – गहाणखत
- Agreement – करारनामा / सौदेपत्रक
- Gift Deed – बक्षिसपत्र / दानपत्र
- Release Deed – हक्क सोडपत्रक
- Partition Deed – वाटणीपत्रक
- Rent Agreement – भाडे करारनामा
- Will – मृत्युपत्र
- Power of Attorney – मुखत्यारपत्र
- Government Valuation – शासकीय मूल्यांकन
- Stamp Duty Refund – मुद्रांक शुल्क परतावा
- Marriage Notice – ऑनलाईन नोटीस मेरेज अप्लिकेशन
- Reconveyance of Mortgage – बोझा उत्तरविणे





**CORPORATE OFFICE:**

Office No-1208 12th Floor, International Trade Centre Kamdhenu, Sector-14 Kharghar, Navi Mumbai - 410210.

+91-7710073844

info@abhitalandsolutions.com

www.abhitalandsolutions.com

**ABHITA LAND® SOLUTIONS PVT LTD**





**सुनिल शेळके,** संस्थापक व सीईओ
उपजिल्हाधिकारी (VRS)

# अभिता : जमिनविषयक प्रश्नांचे एकमेव सोल्युशन

शेतकरी व सामान्यांसाठी शेतिमातीचे प्रश्न अत्यंत जीव्हाळ्यांचे आहेत. शासनाकडून आपल्या स्तरावर यासाठी प्रयत्न सुरुच आहेत. तरीही या प्रश्नांमुळे सर्वसामान्यांची तसेच इतरांचीही प्रचंड ओढाताण होत असते. याला साहजिकच सध्याची प्रस्थापित कार्यपद्धती, कागदपत्रांची संख्या, योग्य ज्ञानाचा अभाव आणि सर्वसामान्यांना न समजणारे कायदे, असे विविध घटक कारणीभूत आहेत. हिच गरज पूर्ण करण्यासाठी अभिता लँड सोल्यूशन कंपनीचा उदय झाला, अशी माहिती या कंपनीचे संस्थापक तथा सीईओ सुनिल शेळके, उपजिल्हाधिकारी (VRS) यांनी दिली. या सेवेच्या माध्यमातून जमिनविषयक विविध प्रश्नांची कायदेशीर पद्धतीने सोडवणूक करवून देण्याची जबाबदारी नागरिकांच्यावतीने अभिता घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या राज्याची स्थापना होण्यापूवी महाराष्ट्र हे अनेक विभागांमध्ये विभागलेले होते. जसे की, विदर्भ राज्य हा मध्यप्रातांत होता. मराठवाडा हा हैद्राबादमध्ये तर मुंबई आणि इतर भाग हे गुजरातसह मुंबई या द्विभाषिक राज्यात होते. असे असताना जमिन विषयक वेगवेगळे कायदे लागू होते. महाराष्ट्रात जमीन महसूल संहिता १९६६ हा कायदा अस्तित्वात आला. हे खरे असले तरी आज वेगवेगळ्या प्रकारचे जमिनविषयक कायदे हे जमिनीला लागू होतात. या कायद्यांची अंमलबजावणी करताना सर्वसामान्य नागरिकांना असंख्य अडचणी येतात. कायद्याची प्रक्रिया समजून घेणे, त्या संबंधातील वेगवेगळया सेवा मिळविणे ही एक अवघड प्रक्रिया झालेली आहे. शंभरावर असलेले जमिनविषयक कायदे हे वेगवेगळ्या जवळपास शासनाच्या ७ ते ८ विभागांमध्ये अमंलबजावणीसाठी विभागल्या गेलेले आहेत. समजा आपल्याला एखादी जमिन किंवा मालमत्ता विकत घ्यावयाची असेल तर त्यासाठी आपल्याला सर्च काढायला एखाद्या वकिलाकडे जावे लागते. त्याचबरोबर त्या जमिनीची मालमत्ता मूल्यांकन करण्यासाठी एखाद्या प्रॉपटी व्हॅलिडेटरकडे जावे लागते. सोबतच या जमिनीची खरेदी-विक्री करायची असेल तर आपल्याला रजिस्ट्री विभागाकडे जावे लागते. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर त्या जमिनीच्या नोंदी करण्यासाठी महसूल विभागाकडे जावे लागते. याच बरोबर जर आपल्याला जमीन अकृषकमध्ये रूपांतरीत करायची असेल तर आपल्याला नगर विकास विभागाकडे जावे लागते. म्हणजे एकच जमीन १०० विविध कायदे आणि त्याच बरोबर त्यांच्या अंमलबजावणीसाठी असलेले ७ ते ८ विभाग या सगळ्या बाबींमुळे सर्व सामान्य नागरिकांना जमीन विषयक विविध सेवा घेण्यास प्रचंड अडचणी निर्माण होतात. यासाठीच अभिता लँड सोल्यूशन प्रायव्हेट लिमिडेट ही कंपनी ऑनलाईन पद्धतीने आणि एकाच छताखाली विविध अशा १५० प्रकारच्या सुविधा घेवून आली आहे. एकाच ठिकाणी आपल्या प्रश्नाचे सोल्युशन मिळू शकते. तेही योग्य मार्गाने! एखाद्या कामासाठी नोंदणी केल्यानंतर संबंधित काम अभिधाची टीम करेल. यासाठी किती दिवसांचा कालावधी लागेल हे ही सांगितले जाईल. कामासाठी भरलेल्या पेमेंटची जीएसटीसह पावती तसेच संबंधित कामाबाबत कायदेशीर अभिप्रायसुद्धा दिला जातो.

## एकाच छताखाली मिळणाऱ्या सुविधा

- Consultancy - मार्गदर्शन
- Search Report - शोध अहवाल
- Title Report - शीर्षक अहवाल
- Legal Audit - कायदेशीर अंकेक्षण
- Property & Machinery Valuation - मालमत्ता आणि यंत्रसामग्री मूल्यांकन
- Registration (All Deeds) - नोंदणी
- Rent Agreement - भाडे कत्तारनामा
- Sale / Purchase / Rent - खरेदी / विक्री / भाडे
- Property & All Insurance - मालमत्ता आणि सर्व प्रकारचे विमा
- Property Loan - मालमत्ता कर्ज
- Survey with a Drone - ड्रोनद्वारे अचूक जमीन मोजणी
- Succession & Heirship Certificate - उत्तराधिकारी आणि वारस प्रमाणपत्र
- Geotechnical Services - जिओटेक्निकल सर्विसेस

## Online consultancy, फक्त ४८ तासात मिळतो कायदेशीर अभिप्राय

१. अकृषक शेतजमिनीचा (NA) प्रस्ताव तयार करणे, झोनबदल व त्याकरिता आवश्यक त्या परवानग्या मिळवण्याकरिता कायदेशीर सहाय्य
२. आदिवासी ते आदिवासी शेत जमिनीची विक्री परवानगी
३. आदिवासी ते गैर-आदिवासी शेत जमिनीची विक्री परवानगी
४. वर्ग -२ च्या शेत जमिनीची विक्री परवानगी
५. सिलिंग कायद्यांतर्गत मिळालेली शेतजमिनीची विक्री परवानगी
६. वर्ग -२ ची शेती वर्ग -१ मध्ये रुपांतरित करण्याचा प्रस्ताव बनविणे
७. पोटखराब - शेती वहिती आणण्याचा प्रस्ताव बनविणे
८. तुकडेबंदी कायद्यांतर्गत तुकडे विक्री परवानगी
९. कुळ कायद्यांतर्गत मिळालेली शेती वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे
१०. शेत जमिनी संबधी भूदान यज्ञ मंडळाची सर्व कामे
११. ७/१२ उताऱ्यातील क्षेत्रफळ व नावांची दुरुस्ती प्रकरणे
१२. CIDCO/MHADA / SRA/MMRDA /PMMRDA सर्व प्रकारच्या सेवा

**CORPORATE OFFICE :**
Office No- 1208 12th Floor, International Trade Centre,
Kamdhenu, Sector-14, Kharghar, Navi Mumbai - 410210

**M.: +91-7710073844**
**www.abhitalandsolutions.com,**
**info@abhitalandsolutions.com**



# ABHITA UAV INFRATECH

**राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवा निमित्त शेतकरी बांधवासाठी ABHITA LAND SOLUTIONS आणि ABHITA UAV यांचे वतीने किसान ड्रोनचे लोकार्पण !!!!**





**Mr. Sunil Shelke**
**Founder & CEO**
**Deputy Collector (VRS)**
**CEO at Abhita Land Solution Pvt. Ltd.**

Abhita UAV - We are Abhita UAV Infratech Service Private Limited. We are a newly Start-up Company. We are into Drone & Surveying services Like Topographic Survey, Corridor Mapping & LiDAR Survey; We are having Fixed Wing PPK drones & VTOL for large scale mapping.

### किसान ड्रोन रोजगाराच्या सुवर्ण संधी

- शेती फवारणी साठी अत्यंत उपयुक्त
- १० ते २० लिटर कीटक नाशके फवारणी येतात
- एकावेळी २ ते ५ एकर पर्यन्त क्षेत्र १५ ते २० मि.
- DGCA (Directorate General of Civil Aviation- भारत सरकार मान्यताप्राप्त)
- बँकिकडून अर्थसहाय्य उपलब्ध
- किमंत - रुपये ४.५ लाखा पासुन

### Agriculture Drone Benifits

- Safety and Health improvement of our farmer no direct contact with pesticide
- Cost Effective For Our Farmers only 400/ Acre
- 90-190 Litre Water Saving because only required 10L/ acre
- Saving Time. 10 Min/ Acres

**Our Client's :** Stesalit Systems, Matrixgeo, HANTECH, YUKRA

Corporate Office No- 1208 12th Floor, International Trade Centre, Kamdhenu, Sector-14 Kharghar, Navi Mumbai - 410210.
www.abhitainfra.com sales@abhitainfra.com +91-8291119435

Powered By
Abhita Land Solution Pvt. Ltd.



# अभिमानास्पद 'अभिता'!

**उपजिल्हाधिकारी हे पद फारच मानाचे, जबाबदारीचे... त्या पदापर्यंत पोहोचायचे म्हणजे कठोर परिश्रमाला पर्याय नाही... इतक्या कठोर परिश्रमाअंती मिळवलेले हे पद नाकारून कुणी जर खात्री नसलेल्या व्यवसायात भविष्य शोधत असेल तर...? हा निर्णय पुरता अव्यावसायिक वाटतो ना...? पण, असे प्रवाहाविरुद्ध पोहणारेच इतिहास घडवत असतात. शेतकरी कुटुंबात जन्मलेले व सामाजिक बांधीलकी जोपासणारे माजी उपजिल्हाधिकारी सुनील शेळके हेही त्यातलेच एक... त्यांनी सुरक्षित नोकरी सोडून संपूर्णतः नवीन असलेली व्यवसायाची वाट निवडली व आपल्या प्रशासनिक अनुभवाच्या बळावर समाजाभिमुख व्यवसाय उभारून स्वतः सोबतच समाजाच्या प्रगतीलाही हातभार लावला... कसा होता हा प्रवास सांगताहेत सुनील शेळके...**

माझा जन्म शेतकरी कुटुंबातील. सामाजिक बांधीलकीचा ध्यास आधीपासनूच मनात होता. त्यासाठीच आधी उपजिल्हाधिकारी झालो. पण, नंतर लक्षात आले की आपला मार्ग वेगळा आहे. पदाचा राजीनामा दिला आणि 'अभिता' लॅन्ड सोल्युशन्स प्रायव्हेट कंपनी सुरू केली. जमीन व मालमत्ता क्षेत्राशी संबंधित सर्व सेवा एकाच छताखाली आणि ऑनलाईन पद्धतीने पुरवणारी ही एकमेव कंपनी.

मुंबई, रत्नागिरी, नाशिक, अमरावती व बुलढाणा येथील पाच शाखा कार्यालये, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, निवृत्त अधिकारी, प्रशिक्षित कर्मचारी आणि त्यांच्या मदतीला ड्रोनसह अत्याधुनिक तंत्रज्ञान. असा हा सर्व अभिताचा विस्तार. जीवनभर मेहनतीने जमवलेल्या पैशातून जमीन, शेती, मालमत्ता खरेदी करणाऱ्यांची अनेकदा फसवणूक होते.

प्रामुख्याने शेतकरी बांधवांची अडचण व फसवणूक ही जणू सार्वत्रिकच बाब झाली आहे. शेती व मालमत्ताचे वर्षानुवर्षे न सुटणारे वाद देखील, शेतकरी आत्महत्यांचे अदृश्य परंतु मुख्य कारण ठरत आहे. प्रशासकीय

## सुनील शेळके -९६०४७०२३४३

सेवेदरम्यान व आता प्रत्यक्षात या क्षेत्रात वावरत असताना मी हे भीषण वास्तव अनुभवले. बुलढाण्यासह इतर ठिकाणी कार्यरत असताना कार्यालयात, दौऱ्यावर असताना बळीराजाच्या या अडचणीची प्रकर्षाने जाणीव होत होती. म्हणूनच मी शिरपूर व अन्य ठिकाणच्या स्वतःच्या शेतात जाण्याचा शिरस्ता कटाक्षाने पाळला. या भेटी म्हणजे एकप्रकारे, शेतकरी मार्गदर्शन मेळावाच ठरायच्या. यातूनच व्यवसायाची कल्पना मनात घर करू लागली. पुढे निर्धार पक्का झाल्यावर नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. अभिताची संकल्पना खुणाऊ लागली. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वतःला प्रयत्नांच्या यज्ञकुंडात झोकून दिले. त्याचे उत्तम परिणाम दिसायला लागले. आजवर १० हजार शेतकऱ्यांना वाजवी मार्गदर्शन करता आले. ही जणू माझी मुख्य उपलब्धी आहे. वडील शिक्षक अन् घरी अल्प शेती. स्थिती जेमतेम. यामुळे जिद्दीने एमपीएससी केली. मंत्रालयात रुजू झालो. पण, जमिनीशी जुळलेली नाळ काही स्वस्थ बसू देईना. अखेर अभिताचा जन्म झाला. दीडेक वर्षात बऱ्यापैकी यश मिळाले. १० हजारांवर शेतकऱ्यांना केलेले स्वच्छ मार्गदर्शन, स्वतःच्या घरकूल, शेतीचे अनेक मध्यमवर्गीय, सेवानिवृत्तांचे, शेतकऱ्यांचे स्वप्न









पूर्ण होण्यात कंपनीने हातभार लावला. नजीकच्या काळात या क्षेत्रातील मोठ्या उद्योग समूहाशी व्यावसायिक करार होणार आहे. हे झाल्यावर ती मोठीच उपलब्धी ठरणार असून कर्मचाऱ्यांना दिवसाचे २४ तास कमी पडतील, इतका कामाचा व्याप वाढणार आहे. मात्र हा सारा प्रवास साधा नव्हता, सोपा तर नव्हताच. मुळातच हा व्यवसाय गुंतागुंतीचा, क्लिष्ट असा. त्यासाठी प्रचंड अभ्यास, परिश्रम, चिकाटी, संयम हे गुण आणि डोक्यावर बर्फ अन् जिभेवर साखर अशी वृत्ती आवश्यक होती. जमिनीविषयक शंभराहून अधिक कायदे असले तरी त्याची ठराविक कागदपत्रे, अर्ज नमुने वगैरे अनेकांकडे नसतात. ती तयार करण्याचे जिकरीचे काम करावे लागले. या क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रामुख्याने शासकीय सेवेत कार्यरत आहेत. अभितासाठी अशा तज्ज्ञ निवृत्त अधिकाऱ्यांची जुळवाजुळव करताना प्रचंड कष्ट उपसावे लागले. निवडलेल्या तरुण तुर्कांना या गुंतागुंतीच्या क्षेत्रासाठी प्रशिक्षित करणे हे प्रचंड आव्हानात्मक होते. कोणतीही ठराविक कागदपत्रे नसल्याने व ऑनलाईन सेवेवर भर असल्याने प्रचंड संख्येने सॉफ्टवेअर तयार करणे व संकेतस्थळ सतत अद्ययावत करीत राहणे क्रमप्राप्त ठरते. या क्षेत्रात वर्षानुवर्षे कार्यरत बड्या उद्योग समूहाशी स्पर्धाही ओघाने आलीच. या क्षेत्रात मराठमोळ्या नावाचा प्रवेश, सर्वांना चक्रावून टाकणारा होता. यामुळे प्रचंड गुंतवणूक करून इन्फ्रास्ट्रक्चर उभे केल्यावरही ग्राहक मिळण्यासाठी दोनेक महिने प्रतीक्षा करावी लागली.

दीडेक वर्षाच्या या सातत्यपूर्ण परिश्रमाचे चांगले परिणाम आता दिसायला लागले आहेत. मात्र आता कामाचे कोणतेही ठराविक वेळापत्रक नाही. नवनवीन आव्हाने खुणावत आहेत.

मी एवढ्यावरच समाधानी नाही. नजीकच्या काळात शेती-मालमत्तेसह कंपनीतर्फे शेतकऱ्यांच्या सर्व योजना, लाभ योजनांचे अर्ज भरणे, ते लाभ मिळवून देण्याचे नियोजन आखण्यात आले आहे. यामध्ये पीक विमा, ते शेताच्या बांध रस्त्याचे प्रस्ताव, सातबारा, कोटवार बुक नोंदी असे सारेच विषय राहणार आहेत. शेतजमीन वा मालमत्तेचा व्यवहार करताना काही कागदपत्रे नसली तरी ती कंपनीतर्फे ठराविक वेळेत मिळवून देण्यात येणार आहेत. थोडक्यात, शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील यावर आपला कटाक्ष राहणार आहे.

**जमीन व मालमत्ता व्यवहारातील या गुंतागुंतीला अनेक कंगोरे आहेत. महाराष्ट्रात जमीन महसूल संहिता हा कायदा १९६६ मध्ये अस्तितवात आला. मात्र आजही जमीनविषयक १०० पेक्षा अधिक कायदे आहेत. कायद्याच्या अमंलबजावणीसाठी सात-आठ विभाग आहेत. जमीन किंवा मालमत्ता विकत घ्यावयाची असेल, तर सर्च काढण्यासाठी वकिलाकडे, मालमत्ता मूल्यांकनासाठी प्रॉपर्टी व्हॅल्यूअर, खरेदी विक्रीसाठी नोंदणी विभाग, नोंदीसाठी परत महसूल विभागाकडे जावे लागते. जमीन अकृषक करण्यासाठी नगर विकास विभागाकडे जावे लागते. म्हणजे एकाच जमिनीच्या व्यवहारासाठी इतका द्रविडी प्राणायाम करावा लागतो. त्यात होणारा वेळ, पैसा, याचा अपव्यय आणि फसवणुकीचा संभाव्य धोका याचा मनस्ताप वेगळाच. शासन खूप प्रयत्न करते पण बाजारपेठांमध्ये त्याला पूरक व्यवस्था नाही. ही बाब लक्षात घेऊनच अभिताचा जन्म झाला. या सर्व अडचणींवर अभिता हे खात्रीचा पर्याय ठरेल, हा माझा विश्वास आहे.**

■ शब्दांकन
- संजय मोहिते